पोलीस दलाप्रमाणे कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी कर्मचा-यांच्या पाल्यांना कारागृह शिपाई भरतीमध्ये ०३ टक्के आरक्षण लागू करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन निर्णय क्र.जेएलई-१११७/११७३/प्र.क्र.२९०/तुरुंग-१ (भाग-२)

दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर २०२६

**वाचा :**
1) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.लवेसू-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२/०८/२०१४.
2) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१, दिनांक १५/०१/२०१६.
3) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.जेएलई-१०१०/५३६/प्र.क्र.१८८/पु.बां.क्र.१२०/तुरुंग-१, दिनांक २६/०४/२०१६.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाद्वारे पोलीस कर्मचा-यांच्या पाल्यांना पोलीस शिपाई भरतीमध्ये ०३ टक्के आरक्षण ठेवण्यात आले.

२. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयाद्वारे पोलीस शिपाई पदाच्या भरतीकरिता अस्तित्वात असलेले सेवाप्रवेश नियम “कारागृह शिपाई, गट क” यांच्या भरतीकरिता लागू करण्यात आले. तसेच, पोलीस शिपाई पदाच्या भरतीकरिता अस्तित्वात असलेल्या सेवाप्रवेश नियमांत वेळोवेळी बदल झाल्यास, तो बदल “कारागृह शिपाई, गट क” यांच्यासाठीही लागू असण्याची तरतूद करण्यात आली.

३. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयाद्वारे पोलीस विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असणारे लाभ कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी अधिकारी/कर्मचा-यांना लागू करण्याबाबत निर्णय घेण्याकरिता, अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली.

४. सदर समितीच्या शिफारशीस अनुलक्षून, पोलीस दलाप्रमाणे, कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी कर्मचा-यांच्या पाल्यांना कारागृह शिपाई भरतीमध्ये ०३ टक्के आरक्षण देणे प्रस्तावित आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

कारागृह शिपाई भरतीमध्ये पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी लागू असलेल्या १० टक्के समांतर आरक्षणामधून, ०३ टक्के आरक्षण हे, कारागृह व सुधारसेवा विभागातील, गट-क व गट-ड मध्ये मोडणा-या सर्व गणवेशधारी कर्मचा-यांच्या (कारागृह शिपाई ते तुरुंग अधिकारी) पाल्यांकरिता, कारागृह शिपाई भरतीमध्ये, याद्वारे, राखीव ठेवण्यात येत आहे.

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशी व मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेस अनुलक्षून हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१४५३४८३४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2026.10.14 14:54:51 +05'30'

**(सुग्रिव धपाटे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) निवड नस्ती, तुरुंग-१.